# नटवर्य माधवराव वालावलकर

जन्मः मृत्यू ः

गंधर्व नाटक मंडळीतील लोकप्रिय गायक कलाकार म्हणून ज्यांचं नाव आजही जुन्या पिढीच्या ओठांवर रेंगाळतं ते नाव म्हणजे या मंडळाचा कणा असलेले माधवराव वालावलकर.नटसम्राट बालगंधर्व हे त्यांचे गुरू होते.“माधवराव म्हणजे माझ्या गंधर्व कंपनीचे खांब आहेत”अशा शब्दांत खुद्द बालगंधर्वांनी त्यांना शाब्बासकी दिली होती.एवढंच नव्हे तर शृंगेरी धर्मपीठाचे तत्कालीन शंकराचार्य जगद्‌गुरू विद्याशंकर भारती यांच्याकडून ‘अभिनयपटू ’ही पदवी माधवरावांना प्राप्त झाली होती.

अशी मानांकने प्राप्त होऊनही माधवराव साधे सरळच राहिले. स्वात›य प्राप्तीनंतर मोठमोठया नेते मंडळींनी खादी वापरण्याचे बंद केले पण माधवराव गांधीजींवरील निस्सीम भक्तीमुळे अखेरच्या श्वासापर्यंत खादीच्या वेषातच राहिले. खादीचा सदरा□खादीचे पंचेवजा धोतर आणि खादीची टोपी या वेषात कधीच बदल केला नाही. गांधीजींच्या खूनानंतर त्यांच्या तत्वांची पायमल्ली करणारेच गांधीजींचे खरे खूनी आहेत ही त्यांची भावना होती.

माधवरावांचा रंगभूमीवर प्रवेश झाला तो ‘संगीत सूर्य’ केशवराव भोसले यांच्याशी जुगलबंदी करताना. **1920** साली माधवराव नाटयदेवतेचे देवेंद्र राजहंस बालगंधर्व यांच्या कंपनीत हजर झाले आणि त्यांनी जवळ जवळ तीस वर्षे गंधर्व नाटक मंडळीत राहून कंपनीचे व स्वतःचे नाव लोकप्रिय गायक नट म्हणून गाजवले.

तारूण्यात पदार्पण करताच वयाच्या चौदाव्या वर्षापासून पेढीवर कारकुनी करण्यात ज्यांची दहा वर्षे सरली ते माधवराव योगायोगाने गायन क्षेत्राकडे वळले. सुरूवातीची सहा वर्षे ललितकलादर्श कंपनीत काम करून नंतर ते बालगंधर्व नाटक कंपनीत गेले.एक कारकून लोकप्रिय नट होतो ही गोष्टचमुळी कोणालाही अचंब्यात टाकणारी ठरली होती.

माधवराव अतिशय निष्ठावान होते. कर्तव्य कठोर होते. जे मायबाप □रसिकजन आपल्यासाठी पैसा खर्च करून येतात□आपला अमूल्य वेळ देतात त्यांना नाराज करायचं नाही याबाबत ते नेहमीच जागृत असत. हीच त्यांची भावना पुढील प्रसंगावरून दिसून येते व आजही आपण हेलावून जातो. मालवणला कंपनीचा मुक्काम असताना त्यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झालं .स्वतः बालगंधर्व खेळ रद्द करण्याविषयी कळवळून□मोठया मायेने सांगत असतानाही माधवरावांनी ते मानलं नाही आणि ‘शो मस्ट गो ऑन ’ असं म्हणत ठरलेला खेळ पूर्ण केला.लोकांच्या आनंदासाठी स्वतःचं दुःख ह्दयाच्या कोप□यात लपवून मोठया निष्ठेने आपलं काम पूर्णत्वास नेणारी माधवरावांसारखी माणसं फारच विरळा.

माधवरावांनी जमा केलेली पुंजी एका पतपेठीत ठेवली होती. पतपेढी बुडाल्याने त्यांच्यावर कफल्लक होण्याची वेळ आली. पण त्यांनी कधीही बॅंकेबाबत अपशब्द उच्चारले नाहीत की कोणाला दूषणे ही दिली नाहीत. आपल्या गोड गळयाचा उपयोग गावेगाव फिरून कीर्तन करण्यात घालवली आणि स्वतःचा खर्च निभावला. अखेर पर्यत स्वावलंबी राहिले. माधवराव माणूस म्हणून फार मोठे होते.नटवर्य बापूराव मानेंच्या पडत्या काळात स्वतःच्या बोटातील सल्ले व पन्नास रूपये काढून देणारे माधवराव म्हणजे माणुसकीचा कळस होता.

लोकांचं जे प्रेम लाभतंय ते खरं गंधर्व नाटक मंडळीवर नसून नटसम्राट बालगंधर्वांवर आहे हे माधवराव ओळखून होते.कितीही झालं तरी आपण बांडगूळ आहोत.मोठया वृक्षाच्या छायेत लहान झाडं वाढत नाहीत याची त्यांना जाणीव होती.आपले अन्नदाते □ आपले गुरू वंदनीय बालगंधर्व यांना त्यांच्या पडत्या काळात माधवरावांनी साथ दिली.

पु.ल.देशपांडे□भार्गवराव आचरेकर□पं.जितेंद्र अभिषेकी□के.टी. देशमुख□बापूराव माने □वसंत शांताराम देसाई अशा मान्यवर कलाकारांचा सहवास ज्यांना अगदी जवळून लाभला त्या मान्यवरांनी माधवरावांबद्दल वेळोवेळी लेख लिहिले यातच माधवरावांच्या कलेचं श्रेष्ठत्व सामावलेलं आहे. एवढंच नव्हे तर गुं.फ. आजगावकर यांनी हे सर्व लेख

माधवरावांनी स्वतः केलेलं टीपण  आणि चाहत्यांची पत्रे यावर एक  गौरव ग्रंथ प्रसिध्द केलेला आहे. केवळ महाराष्ट्र नव्हे तर भारतभर माधवराव वालावलकर या नावाने जे स्थान मिळवलं ते आम्हां कुडाळ देशकर ज्ञातीबांधवांना खचितच  अभिमानास्पद आहे. माधवरावांना  आमचा मानाचा मुजरा.

ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्ह्